MHLA140025062024

## <u>तुर्तातुर्त मनाई हुकूम अर्ज निशाणी क्रमांक ०५ खालील आदेश</u>
## (पारित केल्याचा दिनांक १६ माहे जुन, २०२६)

प्रस्तूत अर्ज वादींनी शपथपत्रासह *दिवाणी प्रकिया संहिता, १९०८ चे कलम ९४ सह आदेश ३९ नियम ०१ व ०२* अनुसार दाव्याचा अंतिम निकाल होईपर्यत प्रतिवादी अगर त्यांचेतर्फे इतरांनी ***वाद मिळकत*** कोणालाही विक्री किंवा हस्तांतर करु नये असा तुर्तातुर्त मनाई हुकूम मिळण्याकामी दाखल केला आहे.

**<u>वादीच्या अर्ज व वादपत्रातील तथ्ये खालीलप्रमाणे</u> :–**

**०२**. वादी थोडक्यात कथन की, वादीने प्रतिवादीविरुध्द दावा मिळकतीचे वाटप होवुन स्वतंत्र ताबा मिळणेबाबत तसेच खरेदीखत क्र.२८६९/२०२४ हे वादीवर बंधनकारक नाही असे जाहीर होवुन मिळणेकरीता सदरचा दावा दाखल केला आहे. वादी क्र. १ व प्रतिवादी क्र. १ हे आपसात पती पत्नी आहेत. वादी क्र. २ ही त्यांची मुलगी आहे. प्रतिवादी क्र. २ ही दावा मिळकतीची बेकायदेशिर खरेदीदार आहे. प्रतिवादी क्र. १ यास मौजे ब–हाणपुर येथे वडीलोपार्जीत स.न. ६२ क्षेत्र १ हे . ४० आर जमीन असुन त्यास दावा मिळकत असे संबोधण्यात येते. वादी प्रतिवादी यांचेत दावा मिळकतीचे वाटप झाले असुन त्यांचा दावा मिळकतीवर एकत्रीत ताबा आहे. प्रतिवादी क्र. २ हे भोळसर स्वभावाचे असुन निरक्षर व अडाणी आहेत. त्याचा गैरफायदा घेवुन खोट्या कागदपत्राआधारे व खोटी माहीती देवुन प्रतिवादी क्र. २ यांनी प्रतिवादी क्र. १ कडुन दावा मिळकतीपैकी १ हे. २० आर क्षेत्राचे विनाताबा, विना मावेजा तथाकथीत

बेकायदेशिर खरेदीखत क्र. २८६९/२०२४ हे दि.०६.०६.२०२४ रोजी नोंदविले तसेच ७/१२ वर नोंद करुन घेतल्या.

**०३.** वादी क्र. २ ही शिक्षणाकरीता तलाठी कार्यालायातुन उत्पन्नाचा दाखला घेण्याकरीता गेली असता प्रतिवादी क्र. १ व २ यांनी खरेदीखत नोंदवलेचे समजले. प्रतिवादी क्र. १ ने कोणतीही कायदेशिर कौटूंबीक गरज नसताना त्यांचे भोळसरपणाचा फायदा घेवुन प्रतिवादी क्र. २ ने दावा मिळकतीचे खरेदीखत करुन घेतल्याने वादीने सदरचा दावा दाखल केला आहे. प्रतिवादी क्र. २ यांनी दाव्याचा अंतिम निकाल लागेपावेतो दावा मिळकत हस्तांतरण, ठरावपत्र, विक्री बक्षीसपत्र किंवा बँकेचा बोजा, गहाणखत करुन नये असा तात्पुरता मनाई हुकूम मागणेकरीता सदरचा अर्ज दाखल केला आहे. .

**०४.** प्रतिवादी क्र. १ यांनी दाव्यात हजर होवुन ही म्हणणे न दिलेने त्यांचे विरुध्द अर्ज विना म्हणणे चालविणेत आला. प्रतिवादी क्र. २ यांनी हजर राहुन कोणतेही म्हणणे न दिलेने त्यांचेविरुध्द नि.क्र. १ वरती एकतर्फा आदेश पारीत करणेत आला आहे.

**०५.** अर्जातील कथन व कागदपत्राचे अवलोकन केले असता प्रस्तूत अर्ज निकाली काढण्याकरीता खालील मुद्दे निर्णयासाठी उपस्थितीत झाले. मी त्या मुद्यांना खालीलप्रमाणे त्यापुढे निष्कर्ष नोंदवित आहे.

| **अ. क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | वादी तुर्तातुर्त ताकीद आदेश मिळण्यासाठी सकृतदर्शनी दावा त्यांच्या लाभात असल्याचे सिद्ध करतात काय? | **होकारार्थी.** |

| | | |
|---|---|---|
| २. | वादी न्यायाचा/सोयीचा समतोल त्यांच्या बाजूने असल्याचे सिद्ध करतात काय? | **होकारार्थी.** |
| ३. | वादी तुर्तातुर्त ताकीद आदेश न मिळाल्यास त्यांचे पैशाच्या स्वरुपात कधीही न भरुन येणारे नुकसान होईल असे सिद्ध करतात काय? | **होकारार्थी.** |
| ४. | वादी तुर्तातुर्त ताकीद आदेश मिळण्यास पात्र आहेत काय? | **होकारार्थी.** |
| ५. | आदेश काय? | **अर्ज अंशतः मंजूर केला.** |

## यु क्ति वा द

**०६.** वादींतर्फे विद्वान विधीज्ञ श्री. एम.एफ. शेख यांचा युक्तिवाद ऐकला.

**०७.** अर्जदारातर्फे त्यांचे युक्तीवादाचे समर्थनार्थ निशाणी क्र. ४ लगत मौजे ब–हाणपुर जमीन सर्वे क्र. ६२ चा ७/१२ उतारा, फेरफार क्र. १४२४ ची नक्कल, खरेदीखत क्र. २८६९/२०२४ ची प्रत, पोलीस उपविभागीय कार्यालय, औसा येथे दिलेल्या अर्जाची प्रत, वादी क्र. १ चे अधारकार्डची प्रत दाखल केले आहे.

**०८.** प्रतिवादींविरुध्द विना म्हणणे आदेश पारित करण्यात आला आहे. सबब त्यांचेतर्फे युक्तीवाद नाही.

## कारणमिमांसा

**मुद्दा क्रमांक ०१ ते ०३ बाबत –**

०९. वादीने सदरचा दावा वाटपाकरीता दाखल करुन दावा मिळकतीचे

वाटप होवुन स्वतंत्र ताबा मिळावा व खरेदीखत क्र. २८६९/२०२४ हे वादीवर बंधनकारक नसलेबाबत जाहिर होवुन मिळावे म्हणुन दावा दाखल केला आहे. वादीचे थोडक्यात कथन की, दावा मिळकत वडीलोपार्जीत असुन वादी व प्रतिवादी क्र. १ एकत्रीतरीत्या दावा मिळकतीचा उपभोग घेत होते तसेच कोणतीही कोयदेशिर कौटुंबीक गरज नसताना प्रतिवादी क्र. १ चे भोळसरपणाचा फायदा घेवुन प्रतिवादी क्र. २ ने सदरचे विना मोबदला तथाकथीत खरेदीखत करुन घेतले आहे म्हणुन वादीने वाटपाचा दावा दाखल केला आहे. दावा मिळकतीचा ७/१२ उतारा पाहिला असता त्यावरुन दावा मिळकत प्रतिवादी क्र. १ चे नावे असलेचे दिसुन येते. वादी क्र. २ ही त्यांची मुलगी असुन तिचा वडीलोपार्जीत मिळकतीमध्ये कायदेशिर हक्क आहे.

१०. पुरावापुर्व परिस्थीतीमध्ये वादीचे कथनानुसार कुटूंबाची कायदेशिर गरज होती किंवा नव्हती हे अभिलेखावर पुराव्यानिशी येणे बाकी आहे. परंतु वादीला प्रतिवादी क्र. २ हे दावा मिळकतीचे हस्तांतरण, विक्री गहाणखत करण्याची शक्यता असलेने त्यांनी दाव्याचा निकाल लागेपर्यत तात्पुरता मनाई हुकूमाची मागणी केली आहे. प्रतिवादी क्र. २, ३ यांनी वादीचे दाव्याला अर्जाला म्हणणे दाखल करुन आव्हानीत केले नाही. त्यामुळे वादीने शपथपत्रासह दाखल केलेले अर्जातील कथने विना आव्हानीत राहिली. वादीने वाटपाचा दावा दाखल केलेने दावा मिळकतीचे हस्तांतरण, विक्री झाले तर वादीचे अपरिमित असे नुकसान होवु शकते. तसेच दाव्यात गुंतागुंत वाढुन इतर पक्षकार व इतर दावे दाखल होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे मी मुद्दा क्र. १ ते ३ चे उत्तर होकारार्थी देवुन मुद्दा क्र. ४ करीता खालील आदेश परीत करत आहे –

**<u>आ दे श</u>**

१. वादीचा तात्पुरता मनाई हुकूमाचा नि.क्र.५ वरील अर्ज अंशतः मंजूर

करण्यात येतो.

२. प्रतिवादींनी दाव्याचा अंतिम निकाल होईपर्यत त्यांनी अगर त्यांचेतर्फे इतरांनी वाद मिळकत कोणालाही विक्री किंवा हस्तांतर करु नये असा तुर्तातुर्त मनाई हुकूम देण्यात येत आहे.

३. अर्जाचा खर्च अंतिम न्यायनिर्णयाच्यावेळी विचारात घेण्यात येईल.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by SABALE SHITAL DATTATRAY
Date: 2026.06.16 17:43:15 +0530

दिनांक – १६/०६/२०२६ (एस. डी. साबळे)
ठिकाण – औसा. २रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,
औसा.